# पर्यावरण चळवळ (environment moment )

## प्रस्तावना (introduction)

महाराष्ट्रातील पर्यावरण चळवळीचा आढावा पुढील प्रमाणे घेता येतो.

Edit with WPS Office

दुसऱ्या महायुद्धानंतर औद्योगिकीकरणाचा वेग वाढला आणि त्याच वेगाने पर्यावरणाचे मुद्देही समोर येण्यास सुरुवात झाली. पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा थेट फटका मानवी समाजावर बसत असल्यामुळे, या मुद्द्यांना सामाजिक आणि राजकीय आयाम आले. यातून, १९६०-७०च्या दशकामध्ये 'ग्रीनपीस,' 'ग्रीन नेटवर्क', 'फ्रेंड्स ऑफ अर्थ' या संघटना आकाराला आल्या.

Edit with WPS Office

नव्याने उदयाला आलेल्या पर्यावरणवाद्यांचा रेटा वाढत गेला, तशी आंतरराष्ट्रीय व्यासपीठालाही त्याची दखल घ्यावी लागली. यातूनच, १९७२मध्ये स्टॉकहोम येथे संयुक्त राष्ट्रांची पहिली मानव-पर्यावरण परिषद झाली. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे, याच व्यासपीठावरून पहिल्यांदा विरळ होणाऱ्या ओझोनच्या थराचे वास्तव मान्य करण्यात आले होते. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरूनच बळ मिळाल्यामुळे सर्वच देशांमध्ये कमी-अधिक प्रमाणामध्ये पर्यावरण चळवळी वाढण्यास सुरुवात झाली.

Edit with WPS Office

- पाश्चिमात्य देशांमध्ये १९८०च्या दशकामध्ये 'ग्रीन पॉलिटिक्स', 'इको ग्रीन्स', 'ग्रीन मूव्हमेंट' यांसारख्या चळवळी आकाराला आल्या. यातही, १९८०च्या दशकामध्ये घडलेल्या भोपाळमधील वायूगळती, चेर्नोबिलच्या अणुभट्टीतील स्फोट, अलास्कामध्ये झालेली तेलगळती आणि आखाती युद्धात पेटविण्यात आलेल्या तेलविहिरी या घटना पर्यावरण चळवळींना आक्रमक होण्यासाठी कारणीभूत ठरल्या. यातूनच, १९८९मध्ये झालेल्या युरोपीय निवडणुकीमध्ये पहिल्यांदा पर्यावरणाचा मुद्दा सर्वांत प्रामुख्याने उचलण्यात आला. त्या निवडणुकीत वेगवेगळ्या देशांमध्ये विखुरलेल्या ग्रीन पक्षांनी एकत्रितपणे प्रचार केला होता.

Edit with WPS Office

तेव्हापासून आजपर्यंत युरोपातील निवडणुकांमध्ये या चळवळी व त्यांचे मुद्दे निर्णायक ठरत आहेत. आजही, जी-७ किंवा आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये पर्यावरणाचा मुद्दा गांभीर्याने चर्चिला जावा, यासाठी युरोपमध्ये सातत्याने आंदोलन होत असते. कार्बन वायूंचे उत्सर्जन टाळण्यासाठी १९८७मध्ये झालेला क्योटो करार किंवा अलिकडेच झालेला पॅरिस करार होण्यासाठी पर्यावरणवाद्यांचा दबाव होता, हे निश्चित.

रिओ दी जानेरो येथे १९९२मध्ये संयुक्त राष्ट्रांची ‘अर्थ समिट’ झाली. यामध्ये एक हजारांपेक्षा जास्त स्वयंसेवी संस्था आणि ५० हजार प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये पर्यावरणाचे जतन करण्यासाठी २७ तत्त्वे निश्चित करण्यात आली होती. ही परिषदही अनेक अर्थांनी महत्त्वाची ठरली.

Edit with WPS Office

भारतामध्ये पर्यावरण चळवळींचा विचार करताना, ४०० वर्षांपूर्वीच्या बिष्णोई समाजाने दिलेल्या बलिदानाची निश्चित आठवण सांगितली जाते. हिमालयातील ऱ्हास थांबविण्यासाठी सुरू झालेली चिपको चळवळ, नर्मदा बचाव आंदोलनापासून टेहरी धरणाला विरोध करण्यासाठी झालेले आंदोलन अशी अनेक उदाहरणे भारतात पाहायला मिळतात. पर्यावरणाच्या मुद्द्यांना सद्यस्थितीतील प्रश्नांशी जोडण्यामध्येही या चळवळींना यश आले आहे. त्यामध्ये राजेंद्रसिंहांनी केलेले जलसंधारणाचे काम, गंगा बचाव चळवळ यांपासून सध्या राबविण्यात येत असलेली 'कावेरी कॉलिंग' ही अशी अनेक उदाहरणे आहेत. रासायनिक खतांमुळे पिकांबरोबरच जमिनीचे होणारे नुकसान टाळण्यासाठी महाराष्ट्रातही 'झिरो बजेट शेती'सारखे प्रयोग होत असून, त्यांची व्याप्ती कमी असली, तरीही त्यांचे महत्त्व नाकारता येणार नाही.

Edit with WPS Office